पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट :- www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/२१७७ /२०२०　　　　　　　　दिनांक ०३/०५/२०२०

विषय:- कोरोना विषाणू मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्यविभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२० /प्रक्र.५८/आरोग्य- ५,दिनांक १४मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र .DMU/2020/CR.92/DISM-1/ दिनांक १७ एप्रिल २०२०

५) कोविड-१९ जलद प्रतिसाद पथक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दिनांक १९/०४/२०२० च्या बैठकीतील शिफारसपत्र क्र.वैद्य/०९/कावि/१८७८/२०२० दिनांक १९/०४/२०२०

६) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र .DMU/2020/CR.92/DISM-1/ दिनांक २१ एप्रिल २०२०

७) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्र. ४०-३/२०२०-DM-I(A) दिनांक १ मे २०२०

८) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र .DMU/2020/CR.92/DisM-1/ दिनांक ०१ मे २०२०

९) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र .DMU/2020/CR.92/DISM-1/ दिनांक ०२ मे २०२०

१०) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र .DMU/2020/CR.92/DISM-1/ दिनांक ०३ मे २०२०

सुधारित आदेश,

ज्याअर्थी कोविड - १९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक महामारी (Pandemic) घोषीत केले आहे.तसेच उपरोक्त संदर्भांकित अधिसूचनेनूसार महाराष्ट्र राज्यामध्ये अधिसुचनेच्या दिनांका पासून साथरोग अधिनियम,१८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.



Scanned with CamScanner

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणू मुळे उद्धवलेल्या कोविड -१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम – २०२० अंमलात आलेले आहेत.महाराष्ट्र कोविड-१९ उपायोजना नियम २०२० अन्वये कोविड -१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे.

ज्याअर्थी," कोरोना" विषाणू प्रसार रोखण्यासाठी केंद्र शासनाने लागू केलेला लॉकडाउन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आदेश क्र ४०-३ /२०२०DM-I(A) दिनांक १५ एप्रिल २०२० अन्वये ३ मे पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ७ अन्वये सदर लॉकडाऊनचा कालावधी दि. ०४ मे २०२० पासुन दोन आठवडे वाढविण्या बाबत आदेशीत केले आहे. ज्याअर्थी संदर्भांकित महाराष्ट्र शासनाचे आदेश दिनांक २ मे २०२० अन्वये लॉकडाउन कालावधी दि. १७ मे २०२० पर्यंत वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, पुणे शहरात दिनांक १० मार्च २०२० रोजी कोविड -१९ चा पहिला रुग्ण आढळून आला व पिंपरी चिंचवड शहरात दिनांक ११ मार्च २०२० कोविड -१९ चा पहिला रुग्ण आढळून आला आहे. केंद्रशासन व राज्यशासन यांनी निर्देशीत केले प्रमाणे वेगवेगळया उपाययोजना राबवण्याची कार्यवाही पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत सुरु करणेत आलेली आहे. दिनांक ०२ मे २०२० अखेर पिंपरी चिंचवड शहरात १२१ एवढे कोविड - १९ या रोगाचे रुग्ण आढळून आलेले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे आदेश दिनांक १७/०४/२०२० मधील मुद्दा क्र. ३ अन्वये राज्यातील कोविड - १९ हॉटस्पॉट निर्माण झालेल्या शहरात म्हणजेच ज्या शहरात कोविड -१९ हे रुग्ण एकाच भागात मोठया संख्येने आढळून आलेले आहेत, सदर रोगाचा उद्रेक झालेला आहे, अशा शहरात कटेंनमेंट झोन निश्चीत करण्याचे अधिकार आयुक्त , महानगरपालिका यांना दिलेले आहेत.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड शहरातील निर्माण झालेल्या क्लस्टर मधिल कोविड -१९ चा वेगाने होणारा प्रसार रोखण्यासाठी व संभाव्य सामुदायीक प्रसार (Community Transfer) टाळण्यासाठी शहरातील नागरिकांच्या हालचालीवर, बाहेर फिरण्यावर मर्यादा आणण्याकरीता संबधित क्षेत्रास कंटेनमेंन्ट झोन घोषित करुन वाढणा-या कोविड - १९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४००००१ यांची अधिसूचना क्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि. १४ मार्च २०२० व "महाराष्ट्र कोव्हीड - १९ उपाययोजना नियम,२०२०" नुसार एखादया भौगोलिक क्षेत्र उदाहरणार्थ गाव, तालुका, वॉर्ड कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड - १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळल्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त समक्ष प्राधिकारी असतील अशा भौगलिक क्षेत्रांच्या बाबतीत



Scanned with CamScanner

१. क्षेत्र प्रतिबंधित करणे

२. क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे

३. क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे बाबत अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना प्राप्त आहेत.

४. प्रतिबंधित क्षेत्रातुन फक्त अत्यावश्यक वस्तु व सेवा पुरविणाऱ्या व्यक्ती आणि वैद्यकीय अत्यावश्यक सेंवा करीता प्रवेश राहील.

५. पुर्व तपासणीशीवाय प्रतिबंधित क्षेत्रात व्यक्ति व वाहनांना प्रवेश करता येणार नाही.

६. प्रतिबंधित क्षेत्रात येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या व्यक्तीच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे.

७. प्रतिबंधित क्षेत्रातील सर्व नागरीकांनी त्यांच्या मोबाईल मध्ये "आरोग्य सेतु" हे ॲप डाऊनलोड करणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ प्रमाणे संभाव्य होणा-या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीवीताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे याकरीता कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सबब, साथरोग नियंत्रण अधिनियम , १८९७ (एपिडमीक अक्ट) मधील तरतूदी नुसार , खालिल नमुद क्षेत्रातील परिसरास कंटेंनमेन्ट झोन घोषीत करणे आवश्यक झाले आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे

| अ. क्र | कंटेंनमेन्ट झोन | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|
| १ | खराळवाडी परिसर, पिंपरी | जामा मस्जिद, खराळवाडी या भोवतीचा परिसर, पिंपरी (गिरमे हॉस्पिटल – अग्रेसन लायब्ररी, क्रिधा ट्रेडर्स, चैताली पार्क हौसिंग सोसायटी, खराळ आई गार्डन, ओम हॉस्पिटल, ओरियंटल बँक, सिटी प्राईड हॉटेल, क्रिस्टल कोर्ट हॉटेल, गिरमे हॉस्पिटल) |
| २ | पि एम टी चौक परिसर, भोसरी | पाटील हॉस्पिटल पिएमटी चौक, मारुती मंदिर, पिसिएमसी पाणी टाकी, भोसरी जुने हॉस्पिटल, विश्वविलास बिर्याणी हाऊस. |
| ३ | गुरुदत्त कॉलनी परिसर, भोसरी | भोसरी आळंदी रोड, बिकानेर स्विट्स, एच पि पेट्रोल पंप, बालाजी मंदिर, भारत पेट्रोल पंप, दुर्वांकुर लॉन मागिल बाजु, न्यु मिलान बेकरी, हरी ओम स्विट्स, महा-ई सेवा केंद्र, ममता स्विट्स, आनंद हॉस्पिटल |
| ४ | रामराज्य प्लॅनेट परिसर, कासारवाडी | सि एम ई हद्द, 7 Apple हॉटेल, सिधार्थ मोटर्स, मुंबई पुणे हायवे, दत्त मंदिर, पोस्ट ऑफिस |
| ५ | गणेश नगर परिसर, दापोडी | पाण्याची टाकी, रेल्वे लाईन, सिध्दि टॉवर्स, माता शितळादेवी चौक, श्रेया एंटरप्रायजेस, न्यु मिलेनियम इंग्लिश स्कुल |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६ | शास्त्री चौक परिसर, भोसरी | संत ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा, परफेक्ट इलेक्ट्रिल, व्यंकटेश मेडीकल, महानगर को-ऑप. बँक, भोसरी आळंदी रोड |
| ७ | तनिष्क ऑर्किड परिसर, चऱ्होली | तनिष्क ऑर्किड सोसायटी हद्द |
| ८ | कृष्णराज कॉलनी परिसर, पिंपळे गुरव | पवना नदी किनारा, दत्त मंदिर, बालाजी हॉटेल, भारत गॅस एजन्सी, पवना नदी किनारा |
| ९ | नेहरुनगर बस डेपो परिसर, नेहरुनगर | जनता सहकारी बँक, नुरानी मस्जिद, पवार पेट्रोल पंप, हैद्राबाद बिर्याणी हाऊस. |
| १० | कावेरीनगर पोलिस लाईन परिसर, वाकड | बि एस एन एल टेलिफोन एक्सचेंज, Seseme शाळा रस्ता, Infant Jesus High School, अण्णाभाऊ साठे नगर |
| ११ | रुपीनगर परिसर, तळवडे | दिपक ग्लास सेंटर, स्वामी समर्थ मठ, त्रिवेणी चौक, भक्ती शक्ती बस डेपो |
| १२ | गंधर्वनगरी परिसर मोशी | जय हनुमान ट्रेडर्स, हॉटेल सुर्योदय, PAMU हायड्रोलिक्स, मोशी कचरा डोपो, पुणे नाशिक हायवे |
| १३ | विजयनगर परिसर, दिघी | शिवशंकर आपार्टमेंट, समायक गॅस एजन्सी, गणेश सुपर मार्केट, राघव मंगल कार्यालय, संत ज्ञानेश्वर रोड, व्ही आर एल कुरिअर सर्व्हिसेस |
| १४ | तनिष्क आयकॉन परिसर, दिघी | पाण्याची टाकी, कृष्ण आंगण कॉमप्लेक्स, ओम साई मिसळ, आळंदि रोड, सुदामा भेळ |
| १५ | मधुबन सोसायटी परिसर, जुनी सांगवी | मुळा नदि, CQAE परिसर, कामटे फुड्स, गणेश मंदिर, कैलास स्विट्स, इंडीअन ऑईल पेट्रोल पंप. |
| १६ | तपोवन रोड परिसर, पिंपरी वाघेरे | सुखवानि सिटी, व्होडाफोन स्टोअर, नंद किराना स्टोअर, ज्ञानेश्वर जनरल स्टोअर, कापसे चौक, वाडेकर मिसळ |
| १७ | १६ नंबर बसस्टॉप परिसर, थेरगाव | औंध रावेत बिआरटीएस रोड, प्रोबस सॉफ्टवेअर प्रा. लि., अक्षय पार्क सोसायटी, इंडीअन बँक, प्रेम कुल्फी सेंटर |
| १८ | शिवाजी चौक परिसर, पिंपळे निलख | एस एस फर्निचर, गुरुदत्त मेडीकल, बाबुराव कामठे चौक, पाण्याची टाकी, जय मल्हार मेस, बाबसाहेब आंबेडकर पथ, कांबळे प्रॉपर्टिज. |
| १९ | इंदिरा नगर परिसर, चिंचवड | बिएसएनल स्टाफ कॉर्टर भिंत, महिंद्रा टु व्हिलर, चिखलि कस्पटे वस्ती बिआरटीएस रोड, सरस्वति को-ऑप. बँक, डबल ट्री हिलटन, कॉर्पोरेशन बँक, ASM'S कॉलेज, तेजस एंचरप्रायझेस, पिंपरी चिंचवड सायन्स पार्क मागील बाजु. |
| २० | शुभश्रि रो हाउस सोसायटी परिसर, पिंपळे सौदागर | कुणाल आयकॉन रोड, एमएसइबी ऑफिस, ओम दत्तराज मंदिर, रोज वुड सोसायटी, सोमनाथ स्नॅक सेंटर, ओम चैतन्य डेअरी, पकवान स्विटस |
| २१ | साठ फुटी रोड परिसर, पिंपळे गुरव | तुळजा भवानी मंदिर, भालचंद्र हॉस्पिटल, निलम सुपर मार्केट, गणेश मंदीर, माऊली हॉटेल, श्रीगणेश डेअरी, जयश्री स्विट्स |



Scanned with CamScanner

त्याअर्थी, पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रामधील उपरोक्त भाग रविवार दि. ०३ मे २०२० रोजी रात्री १२:०० वाजलेपासून पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) म्हणून घोषित करणेत येत असून सदर परिसराच्या सर्व सीमा व उपरोक्त प्रतिबंधित क्षेत्रातुन बाहेर पडणारे सर्व प्रमुख रस्ते बंद करण्यात येत आहेत. त्यानुसार संबंधित पोलिस प्रमुख उक्त भागाच्या हद्दी सील करतील. तसेच, सदर परिसरांच्या हद्दींमध्ये पुढील आदेशापर्यंत नागरीकांना प्रवेशबंदी व घरातून बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

तथापि, सदर आदेशातून परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेल्या व्यक्ति, आस्थापना व कार्यालय यांना सूट देणेत येईल. सार्वजनीक ठिकाणी जाणाऱ्या किंवा वावरणाऱ्या सर्व व्यक्तिंना मास्क वापरणे बंधनकारक आहे.

सदर आदेश पुढील आदेशापर्यंत लागू राहतील. तदनंतर परिस्थितीचा आढावा घेवून जनतेच्या व्यापक हिताचा विचार करुन उचित निर्णय घेण्यात येईल. कंटेनमेंट झोन विषयी यापुर्वी निर्गमित करणेत आलेले आदेश या आदेशाद्वारे निरस्त करणेत येत आहेत.

हा आदेश आज रविवार दिनांक ०३ मे, २०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत माहितीस्तव सादर -

१पुणे ,विभागीय आयुक्त कार्यालय ,विभागीय आयुक्त .मा .
२ .मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्षजिल्हा पुणे ,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ,
३ .मा पोलीस आयुक्त कार्यालय ,पोलीस आयुक्त .पिंपरी चिंचवड
४पुणे ,जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक .
५ .संबधित प्रभारी वैद्यकिय अधिकारीरुग्णालय झोन ,
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित



Scanned with CamScanner

परिशिष्ट - १

१. कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे, पोलिस विभागाचे व राज्य व केंद्रीय विभागांचे विनिर्दिष्ट कर्मचारी व वाहने तसेच अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचारी व वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहेत.तसेच अत्यावश्यक सेवा व वस्तू यांचा पुरवठा करणारी घाऊक वाहतूक सदरच्या आदेशातून वगळण्यात येत आहे.

२. पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील उक्त आदेशातील प्रतिबंधित क्षेत्रे वगळता अन्य क्षेत्रातील सर्व प्रकारचे दवाखाने, इस्पितळे, क्लिनिक, प्रसुतीगृहे व औषधी दुकाने यांना सदर आदेशातुन वगळण्यात येत असुन ती संपुर्ण कालावधीकरीता खुली राहतील.

**प्रतिबंधित क्षेत्रात (कंटेनमेंट झोन) मनपा द्वारे चालविण्यात येणारी अथवा परवानगी दिलेली फिव्हर क्लिनीक वगळता अन्य बाह्यरुग्ण विभाग व खाजगी वैद्यकीय दवाखाने सुरु ठेवण्यास प्रतिबंधीत करण्यात येत आहे.**

३. **पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती, अति जोखमीचे आजार (मधुमेह, उच्च रक्त दाब, दमा, यकृत व मुत्रपिंडाचे आजार, कर्करोग, HIV बाधित रुग्ण इ.) असलेल्या व्यक्ती, गरोदर महिला, वय वर्ष १० पेक्षा कमी वयोगटातील मुले यांना अत्यावश्य सेवा व वैद्यकीय कारणाशिवाय घराबाहेर जाता येणार नाही.**

४. **पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील सर्व व्यक्तींच्या हलचाली अत्यावश्यक सेवा व वैद्यकीय सेवा या कारणांशिवाय रात्री ७ ते सकाळी ७ या कालावधीत प्रतिबंधीत करण्यात येत आहेत.**

५. उपरोक्त नमुद प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या बॅकींग सुविधांसाठी सर्व बँकांनी शाखा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते ०२:०० या वेळेत सुरु ठेवाव्यात तसेच आपली ए.टी.एम.केंद्रे पुर्णवेळ कार्यान्वीत ठेवावीत.

६. प्रतिबंधित क्षेत्रात सदर काळात सकाळी १०:०० ते दुपारी १२:०० या कालवधीतच दुध, भाजीपाला फळे यांची किरकोळ विक्री सुरु राहील.

तसेच उर्वरीत क्षेत्रात दुधाची किरकोळ विक्री सकाळी ६:०० ते सायंकाळी ६:०० या कालवधीतच सुरु राहील.

शहराच्या उर्वरीत भागात भाजीपाला व फळे विक्री ही सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत मनपा मार्फत दिलेल्या आदेश क्र.भूजिं/०२/कावि/२१०/२०२० दि. १५/०४/२०२० व भूजिं /०२/ कावि/२२५/२०२० दि. १७/०४/२०२० नुसार निश्चित केलेल्या जागांवरच सुरु राहिल. त्याव्यतीरिक्त उर्वरित कालावधी मध्ये विक्रीस प्रतिबंध राहील. घरपोच भाजीपाला व फळे विक्री ही मनपाच्या पूर्व मान्यतेनुसारच अनुज्ञेय करण्यात येईल.

७. प्रतिबंधित क्षेत्रात सदर काळात मटण व चिकन यांची किरकोळ विक्री ही या पूर्वी मनपाने दिलेल्या आदेश क्र.भूजिं/०२/ कावि/२२०/२०२० दि.१६/०४/२०२० नुसार सकाळी १०:०० ते दुपारी १२:०० या कालवधीतच सुरु राहिल.



Scanned with CamScanner

शहराच्या उर्वरीत भागात सदर विक्री ही या पूर्वी मनपाने दिलेल्या आदेश क्र.भूजिं/०२/ कावि/२२०/२०२० दि.१६/०४/२०२० नुसार सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत सुरु राहील.

८. कंटेनमेंट क्षेत्रात सदर काळात अत्यावश्यक इतर सामान जसे अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू यांची किरकोळ विक्री सुद्धा सकाळी १०:०० ते दुपारी १२ :०० या कालवधीतच सुरु राहिल. शहराच्या उर्वरीत भागात सदर विक्री सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत सुरु राहील.

९. संदर्भ क्रमाक १०अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारचे मॉल,व्यापारी संकुले,मार्केट हे उक्त लॉकडाऊन कालावधीत बंद राहतील तथापि सादर बाजारपेठा,व्यापरीसंकुलातील अत्यावश्यक वस्तू पुरवठा करणारी दुकाने सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत सुरु राहतील. एकाकी दुकाने,नागरी वसाहतीतील दुकाने,नागरी संकुलातील दुकाने प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) वगळता उर्वरित भागात सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत सुरु राहतील तथापि, एका रस्त्यावरील किंवा गल्लीतील अत्यावश्यक वस्तू पुरवठा करणाऱ्या दुकाना व्यतिरिक्त इतर दुकानांची संख्या पाच पेक्षा अधिक असल्यास अश्या रस्ता किंवा गल्ली मधे अत्यावश्यक वस्तू पुरवठा करणाऱ्या दुकाना व्यतिरिक्तची इतर जास्तीतजास्त पाच दुकाने सुरु ठेवण्यासाठी आवश्यक परवानगी देण्यात येईल. सदर परवानगी महानगर पालिकेच्या प्रभागकार्यालयाकडूनदेण्यात येईल.

१०. जीवनावश्यक वस्तूंचे, औषधांचे व तयार अन्न पदार्थाचे घरपोच वाटप सकाळी ८:०० ते रात्री १०.०० या कालवधीतच मनपाच्या पूर्व मान्यतेने पास घेवून अनुज्ञेय राहिल. सदर सुविधेकरीता फक्त मनपाच्या अधिका-याव्दारे निर्गमीत करण्यात आलेला पास ग्राह्य धरण्यात येईल.

११. अत्यावश्यक सेवांकरिता यापूर्वी पोलिसांमार्फत देण्यात आलेले पास दि. १७ मे पर्यंत लागू राहातील.

१२. शासकीय कार्यालयांना आवश्यक कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक पास मनपा मार्फत उपलब्ध करून दिले जातील. याकरिता संबंधीत आस्थापनेचे विभाग प्रमुख शासनाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक कर्मचा-यांची सूची प्रमाणित करून मनपा कार्यालयास सादर करतील.

१३. मोशी कृषि उत्पन्न बाजार समिती बाबत मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी पारित केलेले आदेश कायम लागू राहतील. बाजार समितीतील व्यवहारांना सदरच्या आदेशामधून वगळण्यात येत आहे.

Scanned with CamScanner